# प्रकरण चौथे

## शैक्षणिक वंचित मुलींची कौटुंबिक आणि सामाजिक पार्श्वभूमि

वंचित मुलांची कौटुंबिक आणि सामाजिक पार्श्वभूमि :--

समाजामध्ये मुले शिक्षणापासून वंचित रहाणे अगर न रहाणे हे त्यांना लाभलेल्या कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण आणि त्यांचे सामाजिकरण हे त्यांना लाभलेल्या पर्यावरणावरच अवलंबून असते. त्यांना लाभलेल्या परिस्थितीविषयक माहिती करुन घेण्यानेच त्यांच्या शैक्षणिक वंचिततेच्या संपूर्ण पार्श्वभूमिचे सम्यक आकलन होऊ शकते. आणि म्हणून त्यांच्या पालकांच्या सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक, कौटुंबिक आणि निवास व्यवस्थे-विषयक गोष्टींचा मागोवा खालीलप्रमाणे घेतला आहे.

अ) वैयक्तिक आणि सामाजिक घटक :

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थितीचे आकलन होण्यासाठी त्यांचे लिंग, वय, त्यांचा जाती-समूह आणि त्यांच्या पालकांचे शिक्षण इत्यादी गोष्टी ज्ञात करुन घेतल्या आहेत.

(१) लिंग --

सर्वसाधारणपणे, समाजामध्ये पुरुषांच्यापेक्षा स्त्रिया शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित राहिलेल्या दिसून येतात. अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्हीही खेड्यांच्या पाहणीमध्ये मला या गोष्टींची प्रचिती आलेली आहे. या संबंधिची स्पष्ट कल्पना खालील तक्त्याच्या आधारे येऊ शकते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचितांची लिंगाप्रमाणे पाहणी केली असता अवंचित पुरुषांचे प्रमाण अधिक (४५ म्हणजे ७५.०० टक्के ) तर वंचित पुरुषांचे प्रमाण कमी (४२ म्हणजे ७०.०० टक्के ) आढळले. अवंचित पुरुषांची जात पातळीवर तपासणी केली असता सुतार आणि लोहार जातीमध्ये अवंचित पुरुषांचे प्रमाण अधिक (प्रत्येकी ४ म्हणजे १००.०० टक्के ) तर मराठा जातीच्या पुरुषांचे प्रमाण कमी (१० म्हणजे ६२.५० टक्के ) आढळले. वंचित पुरुषांची जात पातळीवर तपासणी केली असता चांभार जातीच्या वंचित पुरुषांचे प्रमाण अधिक ( ८ म्हणजे ८८.८९ टक्के ) तर सुतार जातीच्या वंचित पुरुषांचे प्रमाण कमी (२ म्हणजे ४०.०० टक्के ) आढळले.

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित स्त्रियांची पाहणी केली असता वंचित स्त्रियांचे प्रमाण अधिक (१८ म्हणजे ३०.०० टक्के ) तर अवंचित स्त्रियांचे प्रमाण कमी (१५ म्हणजे २५.०० टक्के ) आढळले. वंचित स्त्रियांची जात पातळीवर तपासणी केली असता सुतार जातीच्या स्त्रियांचे प्रमाण अधिक ( ३ म्हणजे ६०.०० टक्के) तर चांभार जातीच्यास्त्रियांचे प्रमाण कमी ( १ म्हणजे ११.११ टक्के ) आढळले. अवंचित स्त्रियांची जातपातळीवर तपासणी केली असता मराठा जातीच्या स्त्रियांचे प्रमाण अधिक (६ म्हणजे ३७.५० टक्के ) तर सुतार आणि लोहार जातींच्या स्त्रियापैकी शिक्षणापासून कोणीही अवंचित आढळले नाहीत.

पाहणीच्या आधारे सर्वसाधारणपणे वंचित आणि अवंचित पुरुषांचे प्रमाण अधिक तर स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. परंतु वरील तक्ता क्रमांक २ मधील अवंचित स्त्रियांची (१५) तक्ता क्रमांक १ मधील वंचित स्त्रियांशी (१८) तुलना केली असता स्त्रियांच्यामध्ये शैक्षणिक वंचितता १६.६७ टक्क्यांनी अधिक असल्याचे आढळून आली. समाजामध्ये एका बाजूने नविन वैज्ञानिकदृष्टिकोनाचा स्वीकार होत असताना दुसऱ्या बाजूने अद्याप जून्या परंपरांना चिकटून असणारा समाज स्त्री-शिक्षणाविषयी फारसा जागरुक दिसत नाही. भारतीय समाजात स्त्री शिक्षणाकडे मुद्दामहून दुर्लक्ष केले

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहे. मुलींनी शिक्षण घेणे हे समाजाला न रुचणारे वाटावे ही आश्चर्याची बाब आहे. विशेषकरुन ग्रामीण समाजामध्ये असे चित्र दिसते की १०० मुलांच्यामागे जवळजवळ ६५ मुली शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आढळतात. मुलींना शिक्षण देऊन शेवटी त्यांची दुसऱ्याच्या घरी पाठवण करावयाची आहे त्यामुळे पालक मुलींच्या शिक्षणावरील खर्च वायफळ समजतात आणि मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवतात. त्यांना घरातील आणि घराबाहेरील अशी अनेक कामे लावली जातात, त्यामुळे मुली मुलांच्या पेक्षा अधिक प्रमाणात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दिसून येतात.

(२) वय —

समाजामध्ये पाहणी अंती असे चित्र दिसते की, ६ ते २० या वयोगटातील बरीच मुले शिक्षणापासून अलिप्त राहिलेली दिसून येतात. ६ ते २० या वयोगटातील मुलांनी शिकण्याचा काळ असताना ती मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळून येतात. दोन्ही सेक्ट्यांच्या पाहणीत या वयोगटातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांचे प्रमाण खालीलप्रमाणे आढळून आले:—

६ ते १० वयोमान असणाऱ्या वंचित आणि अवंचितांचे विश्लेषण केले असता वरील तक्ता क्रमांक ३ आणि ४ नुसार वंचित १ तर अवंचित ६ असल्याचे आढळले. यावरुन या माहितीच्या आधारे दिवसें-दिवस वंचितांचे प्रमाण कमी होईल असे म्हणाव्यास जागा आहे. या उलट, ११ ते १५ या वयोगटामध्ये सर्वसाधारण वंचित ४१ असल्याचे आढळले. परंतु याच वयोगटात वंचितांची संख्या मौजे - सांगाव खेड्याच्या तुलनेत मौजे - म्हालुंगे खेड्यात २१.७४ टक्क्यांनी अधिक असल्याचे आढळले. १६ ते २० या वयोगटामध्ये वंचित मुलांची जात पातळीवर तपासणी केली असता मराठा जातीमध्ये वंचितांचे प्रमाण सर्वाधिक १० म्हणजे ६२.५० टक्के असल्याचे आढळले. आणि सुतार जातीमध्ये ११ ते १५ या वयोगठामध्ये वंचितांचे प्रमाण सर्वाधिक ५ म्हणजे १००.०० टक्के आढळले. या माहितीच्या आधारे असे दिसून येते की, सुतार जातीच्या तरुण मुलांमध्ये वंचितांचे प्रमाण अधिक आढळते.

(३) <u>जात</u> ---

खेड्यामध्ये अनेक जाती - समूहाचे लोक राहतात त्यापैकी साधारणपणे, मराठा, सुतार, लोहार, महार, मांग आणि चांभार जातींच्या कुटुंबाची संख्या इतर जातींच्या कुटुंबापेक्षा काहीशी अधिक असल्याचे आढळून येते. मी अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये या जातींच्या कुटुंबाचे प्रमाण इतर जातींच्या कुटुंबांच्यापेक्षा काहीसे अधिक आहे. या जातींच्या कुटुंबातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांचे प्रमाण खाली दिलेल्या तक्त्यांच्या आधारे स्पष्ट होऊ शकते .

| अनु | जात | पारंपारिक ति... | एकूण | दोन्ही संस्थांची मिळून एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ९(२८.१२) | १४(४३.७५) | ३२(१००.००) |
| २ | सुतार | ३(३३.३३) | ३(३३.३३) | ९(१००.००) |
| ३ | लोहार | २(२५.००) | ३(३७.५०) | ८(१००.००) |
| ४ | महार | ८(२७.५८) | १४ (४८.२८) | २९(१००.००) |
| ५ | मांग | ५(२०.८४) | १३(५४.१६) | २४(१००.००) |
| ६ | चांभार | ३(१६.६७) | १३(७२.२२) | १८(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ३०(२५.००) | ६०(५०.००) | १२०(१००.००) |

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचितांचे जातीनुसार विश्लेषण केले असता शैक्षणिकदृष्ट्या वंचितांचे प्रमाण सर्वाधिक सुतार जातीमध्ये ( ५ म्हणजे ५५.५६ टक्के ) आणि त्यानंतर महार जातीमध्ये (१५ म्हणजे ५१.७२ टक्के ) आढळले, तर सर्वांत कमी मांग जातीमध्ये (११ म्हणजे ४५.८४ टक्के ) वंचितांचे प्रमाण आढळले. त्याचबरोबर शैक्षणिकदृष्ट्या अवंचितांची जातीनुसार पाहणी केली असता, शैक्षणिक अवंचितांचे प्रमाण सर्वाधिक मांग जातीमध्ये ( १३ म्हणजे ५४.१६ टक्के ) तर सर्वांत कमी सुतार आणि महार जातीमध्ये ( अनुक्रमे ४ आणि १४ म्हणजे ४४.४४ आणि ४८.२८ टक्के ) आढळले. अर्थात, मराठा कुटुंबाची संख्या अधिक असूनही अल्पकुटुंबाची संख्या असणाऱ्या सुतार आणि महार जातीच्या वंचित मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले.

या अभ्यास पाहणीसाठी प्रत्येक जातीमधून वंचित आणि अवंचितांचे नमुने जवळ-जवळ सारखेच घेतले असल्याने शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचितांचे प्रमाण कमी की अधिक असा निष्कर्ष काढणे कठीण आहे.

(३) शिक्षण --

शिक्षणामुळे व्यक्तीच्या ठिकाणी विचार करण्याची शक्ती निर्माण होते. शिक्षण या समाजिकरणाच्या प्रक्रियेमुळेच व्यक्तींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संपूर्ण समाजजीवनाची ओळख करुन दिली जाते. समाजामध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक संस्था,समूह,संघटना आणि मंडळे इत्यादींच्या व्दारे अनौपचारिकरित्या आणि शाळा,महाविद्यालय आणि विविध शैक्षणिक संस्था यांच्या मार्फत औपचारिकरित्या समाजातील प्रत्येक व्यक्तींना समाजजीवनाची ओळख करुन दिली जाते. परंतु औपचारिक शिक्षणाचा लाभ समाजातील बहुसंख्या लोकांना मिळालेला नाही. भारतातील ग्रामीण समाजामध्ये तर शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या लोकांचे प्रमाण शहरी समाजपेक्षा अधिक

आहे. त्यात स्त्रियांच्या वंचिततेचे प्रमाण भयानक आहे. अर्थात, समाजातील व्यक्तींचा सर्वांगिण विकास साधावयाचा असेल तर त्यासाठी औपचारिक शिक्षणाचा लाभ प्रत्येक व्यक्तींना मिळणे अत्यावश्यक आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्ही वस्त्यांच्या पाहणीमध्ये मला शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांचे बहुसंख्य पालक शिक्षणापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले याची सकल्पना खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीवरुन येऊ शकते.

| अनु. | जात | आईचे शिक्षण निरक्षार | साक्षार | एकूण | दोन्ही लेख्याचे मिळून वडिल | दोन्ही लख्याचे मिळून आई |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ७(४३.७५) | – | ७(४३.७५) | १५(१००.००) | १६(१००.००) |
| २ | सुतार | (२२(४०.००) | – | २(४०.००) | २(१००.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | २(५०.००) | – | २(५०.००) | ४(१००.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ७(४६.६७) | – | ७(४६.६७) | १३(१००.००) | १५(१००.००) |
| ५ | मांग | ६(५४.५५) | — | ६(५४.५५) | १०(१००.००) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | ६(६६.६७) | — | ६(६६.६७) | ७(१००.००) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ३०(५०.०) | — | ३०(५०.००) | ५१(१००.००) | ६०(१००.००) |

ाजन

| अनु. | जात | गे, ईचे शिक्षण | साक्षार | एकूण | दोन्ही लेख्यातील मिळून वडिल | दोन्ही लेख्यातील मिळून आई |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ०) | — | ६(४०.००) | १५(१००.००) | १५(१००.००) |
| २ | सुतार | ०) | — | १(२५.००) | ३(१००.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | ०) | — | १(२५.००) | ३(१००.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २) | २(१४.२८) | ७(५०.००) | १३(१००.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | ५) | १(७.७०) | ७(५३.८५) | १२(१००.००) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | ६) | १(११.१२) | ७(७७.७८) | ८(१००.००) | ९(१००.००)* |
| एकूण टक्केवारी | | ३८) | ४(६.७७) | २९(४९.२५) | ५४(१००.००) | ५९(१००.००) |

* ही संख्या वडिल

निवडलेल्या शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या शैक्षणिक पात्रतेचे विश्लेषण केले असता शैक्षणिकदृष्ट्या वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक (३० म्हणजे ५८.८२ टक्के ) तर अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये कमी ( १९ म्हणजे ३५.१९ टक्के ) आढळले. हे निरक्षरतेचे प्रमाण जातपातळीवर तपासले असता मांग आणि चांभार या अनुसूचित जातीच्या वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ९ आणि ६ म्हणजे ९०.०० आणि ८५.७२ टक्के ) तर सुतार आणि लोहार जातीच्या वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये अजिबात आढळले नाही. हे विशेष उल्लेखनीय आहे. चांभार आणि मराठा जातींच्या अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ५ आणि ७ म्हणजे ६२.५० आणि ४६.६७ टक्के ) तर सुतार आणि लोहार जातीच्या अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये अजिबात आढळले नाही. त्याच बरोबर वंचित आणि अवंचित मुलांच्या वडिलांच्या साक्षरतेची पाहणी केली असता अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक (३५ म्हणजे ६४.८१ टक्के ) तर वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये कमी (२१ म्हणजे ४१.१८ टक्के ) आढळले. ही साक्षरता जात पातळीवर तपासली असता सुतार आणि लोहार जातीच्या वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी २ आणि ४ म्हणजे १००.०० टक्के ) तर मांग आणि चांभार या अनुसूचित जातीच्या वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये कमी ( प्रत्येकी १ म्हणजे १०.०० आणि १४.२९ टक्के ) आढळले. सुतार आणि लोहार जातीच्या अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ३ म्हणजे १००.०० टक्के ) तर चांभार जातीच्या वडिलांच्यामध्ये कमी (३ म्हणजे ३७.५० टक्के ) आढळले. मुळात मराठा जातीच्याकुटुंबाची संख्या अधिक असूनही सुतार आणिलोहार जातीच्या वंचित आणि अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये शंभर टक्के साक्षरतेचे प्रमाण आढळले. मौजे – सांगाव खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या-

पेक्षा मौजे-म्हाळुंगे खेड्यातील वंचित आणि अवंचित पालकांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळून आले. शिवाय वंचित मुलांच्या वडिलांच्या - पेक्षा अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक आढळले.

शैक्षणिकदृष्ट्या वंचित मुलांच्या मातांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक (५५ म्हणजे ९१.६७ टक्के ) तर अवंचित मुलांच्या मातांच्यामध्ये कमी ( ४३ म्हणजे ७२.८८ टक्के ) आढळले. निरक्षरतेचे हे प्रमाण जातपातळीवर तपासले असता मांग आणि चांभार जातींच्या वंचित मुलांच्या मातांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ११ आणि ९ म्हणजे १००.०० टक्के ) तर सुतार जातीच्या वंचित मुलांच्या मातांच्यामध्ये कमी (३ म्हणजे ७५.०० टक्के ) आढळले. अवंचित मुलांच्या लोहार आणि मांग जातीच्या मातांच्यामध्ये - निरक्षरतेचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ४ आणि १२ म्हणजे १००.०० आणि ९२.३० टक्के ) तर सुतार जातीच्या अवंचित मुलांच्या मातांच्यामध्ये कमी (२ म्हणजे ५०.०० टक्के ) आढळले. त्याच बरोबर वंचित आणि अवंचित मुलांच्या मातांच्या साक्षरतेची तपासणी केली असता अवंचित मुलांच्या मांताच्या-मध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक (१६ म्हणजे २७.१२ टक्के ) तर वंचित मुलांच्या मांताच्यामध्ये कमी (५ म्हणजे ८.३३ टक्के ) आढळले. वंचित मुलांच्या मातांच्या साक्षरतेचे हे प्रमाण जातपातळीवर तपासले असता मराठा, लोहार,सुतार आणि महार जातींच्या मातांच्यामध्ये अत्यल्प तर मांग आणि चांभार जातीच्या माता निरक्षर होत्या. अवंचित मुलांच्या मातांच्या साक्षरतेची जातपातळीवर तपासणी केली असता सुतार जातीच्या मातांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक (२ म्हणजे ५०.०० टक्के ) तर लोहार जातीच्या अवंचित मुलांच्या माता निरक्षर आढळल्या. दोन्ही खेड्यांच्या प्रत्यक्ष पाहणीमध्ये मौजे - सांगाव खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांच्या मातांच्यापेक्षा मौजे - म्हाळुंगे खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांच्या मातांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळले. विशेष करून वंचित मुलांच्या मौजे-म्हाळुंगे खेड्यातील निवडलेल्या मातांच्यामधील एकही माता साक्षर नव्हती, हे ध्यानात

घेण्यासारखे आहे. अर्थात, वंचित मुलांच्या मातांचे साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असून अवंचित मुलांच्या मातांच्यामध्ये सुध्दा साक्षरतेचे प्रमाण कमी आढळले. यावरुन हे स्पष्ट होते की, दोन्हीही खेड्यामध्ये स्त्रीसाक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

ग्रामीण समाजामध्ये पालकांचे निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्व वाटत नाही. आणि त्यांचे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. जे पालक साक्षर आहेत ते त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी जागरुक असतात. मात्र निरक्षरपालक त्यांच्या मुलांना घरातील आणि घराबाहेरील अशी बरीच कामे सांगून त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवतात. त्याशिवाय त्यांचा मुलगा शाळेला जात नसेल तर मुलाच्या नशिबातच शिकावयाचे नाही म्हणून मुलाच्या नशिबावर हवाला ठेवून मोकळे होतात. त्यामुळे निरक्षर पालकांची मुले साक्षर पालकांच्यापेक्षा वंचित असल्याचे आढळून येते.

ब) व्यावसायिक स्थिती ---

विशेषत: अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये प्रत्येक जाती समूहाचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याचे आढळून आले. त्याच बरोबर शेतीला जोड धंदा म्हणून अल्पस्वरुपात का असेना पारंपारिक जातव्यवसायाचेही अस्तित्व अद्याप टिकून आहे. आधुनिक समाजाच्या प्रभावी परिणामामुळे नविन पिढीतील व्यक्ती परंपरागत जातव्यवसायाचा स्विकार करण्यास नाखुश आहेत. त्यामुळे त्या जातव्यवसायापेक्षा नोकरी आणि उद्योगधंदा करण्यामध्येच अधिक समाधान मानतात. परंतु जुन्या पिढीतील वृध्द लोक मात्र अद्यापही कमी स्वरुपात का असेना परंपरागत जातव्यवसाय करण्यामध्ये समाधान मानतात. मी अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्हीही खेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या व्यवसायाची पार्श्वभूमि पुढील तक्त्यांच्या आधारे समजू शकते.

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या व्यवसायानुसार विश्लेषण केले असता, वंचित मुलांच्या मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक ( २६ म्हणजे ४३.३३ टक्के ) तर तुलनेने अवंचित मुलांच्या मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण कमी (१६ म्हणजे २६.६७ टक्के ) आढळले. मजुरीकरणाऱ्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांची जात पातळीवर तपासणी केली असता , वंचित मुलांच्या महार जातीच्या पालकांचे प्रमाण सर्वाधिक (११ म्हणजे ७३.३३ टक्के ) होते, तर अवंचित मुलांच्याही मजुरी करणाऱ्या महार आणि मांग जातीच्या पालकांचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ५ म्हणजे ३५.७२ आणि ३८.४६ टक्के ) होते. दोन्ही सेक्‍यांच्या प्रत्यक्ष पाहणीवरून वंचित मुलांच्या पालकांच्यामध्ये अल्प-भूधारकांचे प्रमाण अधिक असल्यामुळे उदरनिर्वाहासाठी मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण सर्वाधिक आढळले आहे.

वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या शेती व जातव्यवसायाचे विश्लेषन केले असता अवंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण अधिक (२४ म्हणजे ४०.०० टक्के ) तर वंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण कमी ( २० म्हणजे ३३.३३ टक्के ) आढळले. जातपातळीवर तपासणी केली असता शेती व्यवसाय करणाऱ्यामध्ये अवंचित मुलांच्या मराठा जातीच्या पालकांचे प्रमाण ९ म्हणजे ( ५६.२५ टक्के ) होते, तर वंचितामध्ये ते अधिक म्हणजे ११(६८.७५ टक्के ) होते.

जातव्यवसायामध्ये वंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण १४ (म्हणजे २३.३४ टक्के ) होते, तर अवंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण ११ ( म्हणजे १८.३३ टक्के ) होते. अशा प्रकारे मजुरी आणि शेतीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील मुले अधिक वंचित, तर या उलट शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण तुलनेने अशा कुटुंबातून नाममात्र कमी असल्याचे आढळून आले. यावरून, व्यवसायानुसार वंचित आणि अवंचित असा भेद प्रकर्षाने स्पष्ट होत नाही.

क) आर्थिक स्थिती --

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील जवळजवळ ८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, व त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेतीवरच त्यांचे संपूर्ण आर्थिक जीवन अवलंबून आहे. ज्या लोकांच्याकडे जमिन अधिक आहे ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्याचे दिसून येतात. पण जे लोक अल्पभूधारक आणि भूमिहीन आहेत त्यांचे आर्थिक जीवन संपूर्णपणे कोलमडलेले दिसते. या लोकांना त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी दुसऱ्याची शेतमजूरी आणि अन्य स्वरुपाची कामे करावी लागतात. परंतु या शेतमजूरीतून मिळणाऱ्या अल्प उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा संपूर्ण चरितार्थ चालत नाही. कुटुंबाचा चरितार्थ आणि आर्थिक खर्च भागवता यावा म्हणून काही पालक त्यांच्या लहान मुलांचा रोजगारीसाठी उपयोग करुन घेतात. विशेषत: जे पालक अज्ञानी, अशिक्षित आहेत त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणापेक्षा कुटुंबसदस्यांच्या उदरनिर्वाहाची विवंचना अधिक महत्वाची वाटते. त्यामुळे असे पालक त्यांच्या मुलांना शाळेला न पाठवता घरच्या शेतीकामासाठी आणि दुसऱ्यांची शेतमजूरी करण्यासाठी पाठवून देतात. अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्यांच्या पाहणीमध्ये मला असे आढळून आले की, बऱ्याच मुला-मुलींचा कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून घरच्या शेतीकामासाठी, शेतमजूरीसाठी किंवा अन्यस्वरुपातील मजूरी करण्यासाठी पालक उपयोग करुन घेतात. विशेषकरुन दोन्हीही खेड्यातील अनुसूचित जातीच्या कुटुंबातील मुले त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून त्यांच्या पालकांच्या कामामध्ये मदत करताना आढळून आली. पालकांना त्यांच्या कामामध्ये मदत करणारीही मुले पूर्णपणे शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळली. अर्थात, अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांची शेती आणि शेतीतून व अन्य मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न यांचा मागोवा घेतल्यानंतर त्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची संपूर्ण कल्पना येऊ शकते.

(१) शेती --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये मला असे आढळले की, बहुसंख्य पालक हे ३ एकरापेक्षा कमी जमिनधारण करणारे होते तर ३ एकरापेक्षा अधिक जमिनीचे क्षेत्र धारणकरणारे पालक कमी होते. जमिनीचे कमी क्षेत्र धारण करणारे अल्पभूधारक आणि भूमिहीन पालक यांची मुले शिक्षण घेण्यापासून अधिक प्रमाणात अलिप्त राहिलेली दिसून येतात. खाली दिलेल्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या जमिनीच्या क्षेत्राचे विश्लेषण केल्यानंतर ही कल्पना स्पष्ट होऊ शकते.

वर्गिकरण —

| अनु. | जात | गे |  | दोन्ही गटाचे मिळून |
|---|---|---|---|---|
|  |  | मूर्तिन्त | एकूण |  |
| १ | मराठा | १( | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | ३( | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | २( | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २( | ७(६१.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | २( | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | १( | ६(६६.६७ | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी |  | ११( | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

वर्गिकरण —

| अनु. | जात | मूर्तिन्त | एकूण | दोन्ही गटाचे मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | १( | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | ३( | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | ३( | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | — | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | ४( | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | १( | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी |  | १२( | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबांच्या जमिन क्षेत्राची पाहणी केली असता ३ एकरापर्यन्त जमिन धारक असणाऱ्या अवंचित मुलांच्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक म्हणजे ४४ (७३.३३ टक्के ) होती, तर वंचित मुलांच्या जमिनधारक कुटुंबाची संख्या ४१ (म्हणजे ६८.३३ टक्के ) होती. यावरुन भूधारक कुटुंबातील मुले शाळेत जाणारी होती असे दिसते. ३ एकरा-पर्यन्त भूधारक अवंचित मुलांच्या कुटुंबाची जात पातळीवर तपासणी केली असता महार जातीच्या कुटुंबाच्या जमिनधारकांची संख्या सर्वाधिक १४ (म्हणजे १००.०० टक्के ) होती.

वंचित आणि अवंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबाची पाहणी केली असता वंचित मुलांच्या कुटुंबाच्या भूमिहीनांचे प्रमाण अधिक ( १५ म्हणजे २५.०० टक्के ) होते तर अवंचित मुलांच्या कुटुंबाच्या भूमिहीनांचे प्रमाण कमी ( १३ म्हणजे २१.६७ टक्के ) असल्याचे आढळले. वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाच्या भूमिहीनांची जातवार तपासणी केली असता सुतार आणि लोहार जातीच्या वंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण अधिक प्रत्येकी ३ आणि २ ( म्हणजे ६०.०० आणि ५०.०० टक्के ) तर मराठा जातीच्या वंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण कमी १ ( म्हणजे ६.२५ टक्के ) आढळले. त्याच बरोबर सुतार आणि लोहार जातीच्या अवंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ३ म्हणजे ७५.०० टक्के ) तर मराठा आणि चांभार जातीच्या अवंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण कमी ( प्रत्येकी १ म्हणजे ६.२५ आणि ११.११ टक्के ) आढळले. मात्र, अवंचित मुलांच्या महार जातीच्या कुटुंबामध्ये भूमिहीन कोणी आढळले नाही. मुळात मराठा जातीच्या कुटुंबाची संख्या अधिक असूनही भूमिहीनांचे प्रमाण अत्यल्प तर सुतार आणि लोहार जातीच्या कुटुंबाची संख्या कमी असून देखील भूमिहीनांचे प्रमाण अधिक आढळून आले. हे निश्चितपणे ध्यानात घेण्यासारखे आहे. तसेच वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाचे ७ एकरापर्यन्त जमिनीचे क्षेत्र मराठा जातीच्या

काही विशिष्ट कुटुंबातच आढळले.

थोडक्यात भूमिहीन आणि भूधारक या दोन्ही प्रकारच्या कुटुंबातील वंचित आणि अवंचित मुलांच्या संख्यामध्ये नाममात्र फरक असल्याचे आढळून येते.

२. वार्षिक उत्पन्न --

पाहणी केलेल्या दोन्ही खेड्यांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न काही ठराविक पालकांचे उत्पन्न वगळता अत्यंत कमी असल्याचे आढळून आले. दोन्ही खेड्यांमध्ये बहुसंख्य पालक हे अल्पभूधारक आहेत तर काही पालक भूमिहीन आहेत. त्यांच्या अल्पभूमितून व रोजगारीतून त्यांच्या कुटुंबाला पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नाही. त्यांचा दैनंदिन चरितार्थ कसाबसातरी चालेल इतकेच तुटपुंज्य उत्पन्न त्यांना मिळते, त्यामुळे त्यांना त्यांच्या दैनंदिन मुलभूत गरजांची पूर्ती करुन शिल्लकी उत्पन्न प्राप्त होत नाही. याचाच परिणाम म्हणून त्यांचे राहणीमान खालावलेले राहिले आहे. दोन्हीही खेड्यांतील बहुसंख्य पालक हे ६,००० रुपये पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे दारिद्र्यरेषेखाली जीवनमान जगणारे असे आढळले. अर्थात, अशा गरीबीच्या परिस्थितीमध्ये पालकांना मुलांच्या शिक्षणापेक्षा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न महत्वाचा वाटतो. त्यामुळे मुलांचा शेती व अन्य कामासाठी साहाय्य म्हणून उपयोग करुन घेतात व कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्याचा प्रयत्न करतात आणि ते त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. अशा पालकांची मुले शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहतात. खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन दोन्ही खेड्यांतील कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची योग्य पार्श्वभूमिची स्पष्ट कल्पना येऊ शकते.

ाजन —

| अनु | जात | एकूण | दोन्ही लेख्यांतील | |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ७(४३.७५) | १६(१००.००) | |
| २ | सुतार | २(४०.००) | ५(१००.००) | |
| ३ | लोहार | २(५०.००) | ४(१००.००) | |
| ४ | महार | ७(४६.६७) | १५(१००.००) | |
| ५ | मांग | ६(५४.५५) | ११(१००.००) | |
| ६ | चांभार | ६(६६.६७) | ९(१००.००) | |
| एकूण टक्केवारी | | ३०(५०.००) | ६०(१००.००) | |

ाजन —

| अनु. | जात | – ग्हा दुं गे | | | दोन्ही लेख्यातील |
|---|---|---|---|---|---|
| | | रु.१२,००१ ते रु.१८,००० पर्यंत उत्पन्न असणारे | रु.१८,००१ ते रु.२४,००० पर्यंत उत्पन्न असणारे | एकूण | मिळून |
| १ | मराठा | — | — | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | — | — | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | — | — | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | — | — | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | — | २(१५.३८) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | २(२२.२२) | — | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | १(०१.६७) | २(०३.३३) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

तक्ता क्रमांक १२ आणि १३ प्रमाणे शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची तुलना केली असता, वंचित गटातील मुलांच्या पालकां पेक्षा अवंचित गटातील मुलांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अधिक असल्याचे स्पष्ट दिसते. वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक पालकांपैकी २ प्रतिसादक पालकांचे वार्षिक कमाल उत्पन्न रुपये १८,००० पर्यन्त, तर अवंचित गटातील मुलांच्या ६० पालकांपैकी ६ पालकांचे कमाल वार्षिक उत्पन्न रुपये २४,००० पर्यन्त असल्याचे माहितीमध्ये आढळले. वरील तक्ताक्रमांक १२ आणि १३ मधील माहितीनुसार म्हाळुंगे खेड्यातील पालकांच्या उत्पन्नापेक्षा सांगाव खेड्यातील पालक तुलनेने वरच्या उत्पन्न गटातील दिसतात. किमान रुपये ६,००० पर्यन्त वार्षिक उत्पन्न गटानुसार माहिती तपासली असता अवंचित मुलांच्या कुटुंबापेक्षा ( ४५ म्हणजे ७५.०० टक्के ) वंचित कुटुंबाचे प्रमाण अधिक (५४ म्हणजे ९०.०० टक्के ) असल्याचे आढळले.

तसेच, वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न जातपातवार तपासले असता वरच्या उत्पन्न गटात ( म्हणजे रु.६,००१ ते रु.२४,००० पर्यन्त ) विशेषत्वाने मराठा जातीचेच पालक आढळतात. आणि नमुना पाहणीतील एकूण १२० प्रतिसादक पालकांपैकी ९९ पालक रु.६,००० या किमान उत्पन्न गटातील आहेत. यावरुन बहुतांशी म्हणजे ८२.५० टक्के पालक हे किमान उत्पन्न गटातील आहेत. परंतु यामध्ये तुलनेने वंचित गटातील पालकांचे प्रमाण अधिक ( म्हणजे ५४.५५ टक्के ) आहे.

ह ) कौटुंबिक स्थिती --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांची अपत्यांची संख्या आणि कुटुंबसदस्य संख्या सर्वसाधारणपणे, काहीशी अधिक असल्याचे दिसून येते. या खेड्यांमध्ये एकत्र किंवा संयुक्त कुटुंबाचे अस्तित्व स-हीसपणे टिकून असल्याचे दिसून येते. कुटुंबातील अधिक सदस्य संख्येमुळे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल याविषयी ते फारसे जागरुक असत नाहीत. शिवाय अधिक सदस्य असल्यामुळे कुटुंबासाठी

लागणारे आर्थिक साहाय्य व अन्य गोष्टींची पूर्तता केली जाणार असल्याचा दृढ विश्वास त्यांना वाटतो. आणि त्यांची कुटुंब सुरक्षिततेची भावना अधिक वाढते. त्यामुळे कुटुंबात अधिक सदस्य असणे त्यांना अतिरिक्त वाटत नाही. त्याच बरोबर बहुसंख्य पालक अज्ञानी आणि अशिक्षित असल्यामुळे ते समाजातील अंध:श्रध्दा ,अनिष्ठ चालिरितींना आणि सवयींना चिकटून राहिलेले आहेत. अपत्य ही देवाची देणगी समजून कुटुंब नियोजन साधनांचा वापर करुन कुटुंब मर्यादित ठेवणे हे ईश्वरीकृपे विरुध्द आहे असे ते समजतात, त्यामुळे एक किंवा दोन अपत्यांना जन्म देऊन त्याना शिक्षण देऊन शहाणे करण्याचा विचार सोडून देऊन अधिक अपत्यांना जन्म देण्यात ते धन्यता मानतात. परंतु काही साक्षर पालक एक किंवा दोन अपत्यांना जन्म देऊन त्यांना शिक्षण देऊन शहाणे करण्याचा विधायक विचार करुन त्यांचे कुटुंब मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

१ : पालकांच्या अपत्यांची संख्या --

दोन्हीही क्षेत्रामध्ये मला पाहणी अंती असे आढळून आले की, निवड केलेल्या शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांची अपत्य संख्या ही सर्वसाधारणपणे, सरासरी ४ किंवा ५ अपत्य एवढी आहे. मात्र जे पालक सुशिक्षित आहेत त्यांनी दोन किंवा तीन अपत्यांना जन्म देऊन कुटुंब मर्यादित ठेवून ते अपत्यांचे शिक्षण पूर्ण करित असल्याचे आढळून आले. खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीवरुन पालकांच्या अपत्यांच्या संख्येविषयी स्पष्ट कल्पना येऊ शकते. :--

तक्ता क्रमांक १४ आणि १५ प्रमाणे शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या अपत्यांच्या संख्येची पाहणी केली असता, १२० प्रतिसादक पालकांपैकी १ ते ४ मुले असणाऱ्या गटात वंचित आणि अवंचित मुलांचे ९२ पालक आढळले. यावरुन बहुतांशी म्हणजे ७६.६७ टक्के पालक १ ते ४ मुले असणाऱ्या गटातील दिसतात. १ ते ४ मुले असणाऱ्या गटाचे ६० प्रतिसादक पालकांपैकी तुलनेने अवंचित मुलांचे पालक अधिक ( ५० म्हणजे ८३.३३ टक्के ) आढळले. १ ते ४ मुले असणाऱ्या मुलांच्या पालकांची जातपातळीवर तपासणी केली असता अवंचित मुलांच्या सुतार, लोहार आणि मांग जातीच्या पालकांचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ४,४ आणि १३ म्हणजे १००.०० टक्के ) आढळले. अर्थात, १ ते ४ मुले असणाऱ्या अवंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण तुलनेने वंचित मुलांच्या पालकांपेक्षा अधिक आढळून आले. यावरुन अवंचित मुलांचे पालक कुटुंब मर्यादित ठेवत असल्याचे माहितीच्या आधारे स्पष्ट दिसते. त्याच बरोबर सांगाव खेड्यातील १ ते ४ मुले असणारे पालक अधिक तर ५ ते ८ मुले असणारे म्हाळुंगे खेड्यातील पालक अधिक आढळून आले.

तक्ता क्रमांक १४ आणि १५ प्रमाणे वंचित आणि अवंचित मुलांच्या १२० प्रतिसादक - पालकांपैकी केवळ २८ पालक ५ ते ८ मुलांची संख्या असणारे आढळले. यावरुन २३.३३ टक्के पालक ५ ते ८ मुले असणाऱ्या गटातील दिसतात. ६० प्रतिसादक-पालकांपैकी वंचित मुलांचे पालक ५ ते ८ मुलांची संख्या असणाऱ्या गटाचे ( १८ म्हणजे ३०.०० टक्के ) दिसतात. तेव्हा या गटाच्या पालकांचे प्रमाण अल्पांशाने अधिक आहे. ५ ते ८ मुलांची संख्या असलेल्या वंचित मुलांच्या पालकांची जात पातळीवर तपासणी केली असता इतर जातिच्या तुलनेत चांभार जातीच्या वंचित मुलांच्या पालकांची संख्या सर्वाधिक ( ५ म्हणजे ५५.५६ टक्के ) असल्याचे आढळली.

पाहणी केलेल्या दोन्ही खेड्यामध्ये ४ पेक्षा अधिक अपत्य असलेल्या पालकांना त्यांच्या सर्व मुलांना शिक्षण देणे शक्य होत नाही. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या किंवा गरीब पालकांना त्यांच्या मुलांच्या

शिक्षणावरील खर्च न पेलणारा असल्यामुळे असे पालक केवळ एक किंवा दोनच मुलांना थोडेफार शिक्षण देतात. आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून मुलांचा साहाय्यक म्हणून उपयोग करुन घेतात. त्यामुळे अशा पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळतात. शिवाय कुटुंबामध्ये कुटुंबसदस्य संख्या अधिक असेल तर त्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते व त्यामुळेही मुले शिक्षणापासून अलिप्त रहातात.

२: <u>कुटुंबातील सदस्य संख्या</u> --

अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्याच्या पाहणीमध्ये शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबातील सदस्य संख्या एकत्र कुटुंबपध्दतीच्या अस्तित्वामुळे काहीशी अधिक असल्याचे आढळून आले. अधिक सदस्यसंख्या असलेल्या कुटुंबातील मुले मर्यादित सदस्य संख्या असलेल्या कुटुंबातील मुलांच्या पेक्षा काही प्रमाणात अधिक शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळून येतात. या विषयीची स्पष्ट कल्पना खालील तक्त्यातील माहितीवरुन येऊ शकते.

| अ.क्र. | जात | १ ते स्य अल | एकूण | दोन्ही वेळ्यातील मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | — | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | २(४० | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | — | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २(१३ | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | ३(२७ | ६(५४.५४) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | १(११ | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ८(१३ | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

| अ.क्र. | जात | १ ते स्य अस | एकूण | दोन्ही वेळ्यातील मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ३(१८ | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२५ | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | ३(७५ | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २(१४ | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | २(१५ | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | १(११ | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | १२(२० | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबातील सदस्य संख्येची पाहणी केली असता ५ ते ८ पर्यन्त कुटुंबसदस्यसंख्या असणाऱ्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक (३९ म्हणजे ६५.०० टक्के ) परंतु, तुलनेने सारख्या प्रमाणात आढळले. ५ ते ८ पर्यन्त कुटुंब सदस्य असलेल्या वंचित मुलांच्या कुटुंबाची जात पातळीवर तपासणी केली असता लोहार जातीच्या वंचित मुलांच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक ( ४ म्हणजे १००.०० टक्के ) तर त्या खालोखाल मराठा जातीमध्ये १२( म्हणजे ७५.०० टक्के ) आढळले. त्याचबरोबर ५ ते ८ पर्यन्त कुटुंबसदस्य संख्या असलेल्या अवंचित मुलांच्या कुटुंबाची जात पातळीवर तपासणी केली असता मांग, सुतार आणि चांमार यांच्या कुटुंबाची संख्या अनुक्रमे १०, ३ आणि ६ ( म्हणजे ७६.९२ , ७५.०० आणि ६६.६७ टक्के ) अशी आढळली. तक्ता क्रमांक १६ आणि १७ च्या माहितीच्या आधारे कुटुंबातील सदस्य संख्या मुले शिक्षणापासून वंचित होणे अगर न होणे यावर परिणाम होत असल्याचे तुर्त-तरी दिसून येत नाही. मात्र ९ ते १२ पर्यन्त कुटुंब सदस्य संख्या असलेल्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाची पाहणी केली असता वंचित मुलांच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक ( ७ म्हणजे ११.६७ टक्के ) तर अवंचित मुलांच्या कुटुंबाचे प्रमाण कमी ( ३ म्हणजे ५.०० टक्के ) आढळले. परंतु एकंदर नमुना पाहणीत हे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे कुटुंबाचा आकार मुलांच्या वंचिततेवर परिणाम करणारा आहे, असे विधान करणे संयुक्तीक होणार नाही.
कुटुंबातील सदस्यसंख्येचा मुले शिक्षणापासून वंचित होणे अगर न होणे यावर परिणाम होत असल्याचे तुर्त तरी दिसत नाही, असा जरी युक्तीवाद केला असला तरी जे कुटुंब दरिद्री आणि कुटुंबसदस्यसंख्येने अधिक आहे अशा कुटुंबातील मुले पालकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेली आहेत.

३ : निवास व्यवस्था --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यांतील शैक्षणिकदृष्ट्या आणि अवंचित मुलांच्या कुटुंबातील बहुसंख्य पालकांची घरे मातीची, तर काही ठराविक पालकांची घरे दगड आणि विटा यांनी बांधलेली होती. ब-याच पालकांच्या - घरामध्ये धान्य,जनावरे,लाकुड-फाटा, भांडी-कुंडी इत्यादी गोष्टींची कशीबशी व्यवस्था लावलेली आढळून आली. त्यामुळे त्यांची निवासाची अपुरी सोय असल्याची कल्पना आली. त्याच बरोबर दोन्हीही खेड्यामध्ये विद्युतीकरण केले असले तरी जवळ जवळ ४५ टक्के पालकांच्या घरी विद्युत दिव्यांची सोय नसल्याचे आढळून आले. शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या घरची निवास व्यवस्थेविषयी सविस्तर कल्पना खालील तक्त्यावरुन घेऊ शकतो.

| निवासाची सोय | | | विद्युत दिव्याची सोय | | | दोन्ही सेव्यांची मिळून |
|---|---|---|---|---|---|---|
| ...रेशी | अपुरी | एकूण | आहे | नाही | एकूण | |
| २(१२.५०) | ५(३१.२५) | ७(४३.७५) | ५(३१.२५) | २(१२.५०) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| - | २(४०.००) | २(४०.००) | १(२०.००) | १(२०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| — | २(५०.००) | २(५०.००) | — | २(५०.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| - | ७(४६.६७) | ७(४६.६७) | ५(३३.३३) | २(१३.३३) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| - | ६(५४.५५) | ६(५४.५५) | २(१८.१८) | ४(३६.३६) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| - | ६(६६.६७) | ६(६६.६७) | ४(४४.४५) | २(२२.२२) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| २(३.३३) | २८(४६.६७) | ३०(५०.००) | १७(२८.३३) | १३(२१.६७) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

—

म्हा ळुं बे

| निवासाची सोय | | | विद्युत दिव्याची सोय | | | दोन्ही सेव्यांची मिळून |
|---|---|---|---|---|---|---|
| ...रेशी | अपुरी | एकूण | आहे | नाही | एकूण | |
| — | ७(४३.७५) | ७(४३.७५) | ४(२५.००) | ३(१८.७५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| १(२५.००) | - | १(२५.००) | १(२५.००) | - | १(२५.००) | ४(१००.००) |
| - | १(२५.००) | १(२५.००) | १(२५.००) | — | १(२५.००) | ४(१००.००) |
| १(७.१४) | ६(४२.८५) | ७(५०.००) | ६(४२.८५) | १(७.१४) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ४(३०.७७) | ३(२३.०८) | ७(५३.८५) | ४(३०.७७) | ३(२३.०८) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| १(११.११) | ६(६६.६७) | ७(७७.७८) | ७(७७.७८) | — | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| ७(११.६७) | २३(३८.३३) | ३०(५०.००) | २३(३८.३३) | ७(११.६७) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

घराच्या प्रकारानुसार पाहणीत असे आढळून आले की, वंचित मुलांच्या प्रतिसादकांच्या एकूण ६० घरा पैकी ४५ ( म्हणजे ७५.०० टक्के ) प्रतिसादकांची घरे मातीची होती, तर या उलट सर्वाधिक १७ घरे ( म्हणजे २८.३३ टक्के ) अवंचित मुलांच्या प्रतिसादक-पालकांची दगड । विटांची होती. यामध्ये सर्वाधिक मातीची घरे विशेषत्वाने सुतार आणि मांग ( प्रत्येकी ५ आणि ११ म्हणजे १००.०० टक्के ) वंचित प्रतिसादकांची आणि सुतार आणि लोहार ( प्रत्येकी ४ म्हणजे १००.०० टक्के ) अवंचित प्रतिसादकांची होती.

निवासाच्या सोईनुसार पाहणी केली असता, वंचित मुलांच्या ५५ ( म्हणजे ९१.६७ टक्के ) प्रतिसादक पालकांना, तर अवंचित मुलांच्या सर्वाधिक ४४ ( म्हणजे ७३.३३ टक्के ) प्रतिसादक - पालकांनी निवासाची सोय अपुरी असल्याचे सांगितले. या दोन्हीतील तुलनेत वंचित मुलांना त्यांच्यादृष्टीने निवासाची सोय अपुरी आणि गैरसोयीची असल्याची आढळून आली. वंचितांच्या बाबतीत निवासाची सोय जात पातळीवर तपासली असता,मराठा जातीच्या प्रतिसादकांना वगळता बाकी इतर सर्व जातीच्या प्रतिसादकांनी निवासाची सोय अपुरी असल्याचे सांगितले. या उलट मराठा,मांग आणि महार जातीच्या अवंचित मुलांच्या अनुक्रमे ५ ( म्हणजे ३१.२५ टक्के ), ४ (म्हणजे ३०.७६ टक्के ) आणि ४ ( म्हणजे २८.५८टक्के ) ) प्रतिसादक पालकांनी निवासाची सोय पुरेशी असल्याचे सांगितले. वंचितांच्या तुलनेत काहे प्रमाणात कां होईना अवंचित मुलांना निवासाची सोय पुरेशी होती.

विद्युत दिव्याची सोय वंचित मुलांच्या २८ (म्हणजे ४६.६७ टक्के ) प्रतिसादक-पालकांच्या घरामध्ये नव्हती तर अवंचित मुलांच्या ३८ ( म्हणजे ६३.३४ टक्के ) घरामध्ये होती. म्हणजेच तुलनेने वंचितापेक्षा अवंचित मुलांना विद्युत दिव्याची सोय उपलब्ध झाली होती. जात पातळीवर विद्युत दिव्याच्या उपलब्धतेनुसार तपासणी केली असता लोहार, सुतार,मांग,महार,चांभार आणि

मराठा याजातीच्या वंचित मुलांच्या अनुक्रमे ३ (म्हणजे ७५.०० टक्के ), ३ ( म्हणजे ६०.०० टक्के ), ६ ( म्हणजे ५४.५५ टक्के ), ८ ( म्हणजे ५३.३३ टक्के ) ,३ (म्हणजे ३३.३३ टक्के ) आणि ५ ( म्हणजे ३१.२५ टक्के) घरी विद्युत दिव्याची सोय नसल्याचे आढळले. या उलट लोहार,चांभार,महार, मांग, मराठा आणि सुतार या जातीच्या अवंचित मुलांच्या अनुक्रमे ४ (म्हणजे १००.०० टक्के ), ८ ( म्हणजे ८८.८९ टक्के ), ९ ( म्हणजे ६४.२८ टक्के ), ७ ( म्हणजे ५३.८५ टक्के ) , ८ ( म्हणजे ५०.०० टक्के ) आणि २ ( म्हणजे ५०.०० टक्के ) घरी विद्युत दिव्याची सोय उपलब्ध होती. म्हणजेच तुलनेने अधिक अवंचित मुलांच्या घरी विद्युत दिव्याची सोय होती.

वरील प्रमाणे तक्त्यातील माहितीचे विश्लेषण लक्षात घेता असे दिसते की,अवंचित मुलांच्यापेक्षा वंचित मुलांची मातीची घरे, विद्युत दिव्याची गैरसोय आणि निवासाची अपुरी सोय अधिक प्रमाणात होती. अपुरी निवासाची व्यवस्था असलेल्या घरामध्ये मुलांना त्यांच्या पालकांच्याकडून योग्यमार्गदर्शन आणि शाळेविषयी आवड निर्माण करणे कठीण जाते. पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यांमध्ये अपुऱ्या निवासाच्या जागेतच जनावरे, शेळ्या-मेंढया, कोंबड्या, लाकुड-फाटा,धान्य,शेतीची अवजारे,आणि कपडे-लते इत्यादी वस्तुंची कशीतरी दाटीवाटीने व्यवस्था केलेली आढळली. अशा घरातील अडचणीच्या जागेत मुलांच्या शिक्षणास वाव तो कसला मिळणार ? अर्थात, अशा कुटुंबातील मुले शिक्षणापासून बहुसंख्येने वंचित राहिलेली आढळतात.

सारांश --

दोन्हीही खेड्यांतील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या सामाजिक,कौटुंबिक,शैक्षणिक आणि आर्थिक पार्श्वभूमिवर दृष्टिक्षेप टाकला असता शैक्षणिकदृष्ट्या अवंचित मुलांच्या पालकांच्या तुलनेत वंचित मुलांच्या पालकांच्यामध्ये अशिक्षितता,दारिद्र्य,कौटुंबिक असुरक्षितता आणि निवासाची अपुरी सोय अधिक असल्याचे आढळून आले.